जिल्हा बाल संरक्षण कक्षाकरीता प्रत्येक जिल्ह्यात १२ पदे कंत्राटी तत्वावर मंजूर आहेत. सदर पदांपैकी रिक्त पदे तसेच बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समिती मधील रिक्त डाटा एन्ट्री ऑपरेटर हे पद भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. सर्व जिल्ह्यात मिळून जिल्हा बाल संरक्षण कक्षातील एकूण रिक्त १५८ पदे तसेच बाल न्याय मंडळ १८ व बाल कल्याण समिती मधील १९ असे ३७ डाटा एन्ट्री ऑपरेटर असे एकूण १९५ रिक्त पदांची गुणवत्ता यादी मधून निवड जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येईल.
२. जिल्हानिहाय उपलब्ध पदांचा सविस्तर तपशील शैक्षणिक पात्रता अनुभव आणि इतर अटी व शर्तीबाबतची माहिती wcdcommpune.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
३. सदरच्या पदासाठी अर्ज या संकेतस्थळावर दिलेल्या सूचनेनुसार ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अथवा पोस्टानी पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
४. अर्ज भरताना दिलेल्या सूचना व्यवस्थित वाचून अर्ज भरावा.अर्धवट भरलेले चुकलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरणे जाणार नाही.तसेच शैक्षणिक पात्रता व अनुभव या बाबतची अपूर्ण अथवा चुकीचे प्रमाणपत्र अपलोड केल्यास सदर फॉर्म बाद ठरवला जाईल.
५. ऑनलाईन अर्जामधील '*' हे चिन्ह दर्शक सर्व बाबी पुर्ण भरणे आवश्यक राहील. तसेच अर्जात स्वत:चा कार्यान्वित फोन नंबर (भ्रमणध्वनी क्रमांक) आणि ई-मेल नोंदविणे आवश्यक आहे.
६. उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रक्रियेबाबतच्या सूचना संकेतस्थळावर अथवा ई/ मेलद्वारे कळविण्यात येईल.
७. सदरच्या भरती प्रक्रियेत अथवा पदांमध्ये फेरबदल तसेच भरती प्रक्रिया काही अपरिहार्य कारणास्तव स्थगित अथवा रद्द करण्याचे अधिकार सदस्य सचिव तथा आयुक्त महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.
८. उमेदवारास कोणत्याही एकाच जिल्ह्यातून अर्ज करता येईल.
९. एकापेक्षा अधिक पदासाठी अर्ज करावयाचा असेल तर स्वतंत्र अर्ज न करता या अर्जातच प्राधान्यक्रम नमूद करावयाचा आहे.प्रत्येक पदासाठी स्वतंत्र रु.१५० एवढे शुल्क ऑनलाईन पद्धतीने आकारण्यात येईल.
१०. अर्ज केलेल्या जिल्ह्यात एकदा निवड झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास जिल्हाबदल करून मिळणार नाही.
११.बाल संरक्षण योजनेअंतर्गत कामाचा अनुभव असलेल्या/ कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना भरतीप्रक्रियेत प्राधान्य देण्यात येईल परंतु अशा कर्मचाऱ्यांना भरती प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक राहील.
१२.अर्ज सादर करण्याची व शुल्क भरण्याची अंतिम मुदत दि.१९/०८/२०२२ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत राहील या नंतर संकेतस्थळ बंद होईल.
१३.पदाकरिता आवश्यक असलेल्या अटी शर्तीतील एकही अटीची पूर्तता होत नसेल तर अर्जदाराचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
१४.महिला व बाल विकास विभागाकडून अनाथ प्रमाणपत्र प्राप्त उमेदवारांना शैक्षणिक व इतर पात्रता धारण करत असल्यास निवड प्रक्रियेत प्राधान्य देण्यात येईल.

**जिल्हा बाल संरक्षण कक्षातील पद्रियुक्तीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

१. वयोमर्यादा- १८ ते ४३ वर्ष (जाहिरात दिनांकास उमेदवाराचे वय १८ वर्ष पूर्ण असावे तसेच ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२. सदर पदभरती मध्ये अनाथ आरक्षणाबाबत महिला व बाल विकास विभागाचे शासन लागू राहील.

३. सदर पदे संपूर्णता कंत्राटी तत्वावर राहणार असून कराराची मुदत ११ महिने किवा योजना कार्यान्वित असेल यापैकी जे आधी घडले या मुदतीकरता राहील. मुदत संपल्यावर कंत्राटी तत्वावर कार्यरत व्यक्तीचा सदर पदावर कोणतीही हक्क राहणार नाही.

४. सदरची नियुक्ती हि करारपद्धतीने असल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत /सामावून घेण्याबाबतचे व नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळणे अनुज्ञेय असणार नाही.

५. सदरची पदे हि ११ महिन्यांच्या करार तत्वावरील व अस्थाई स्वरुपाची असल्याने संबंधीतास शासनाच्या संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबत न्यायालयात दाद मागता येणार नाही त्याबाबत १००/- रुपयांच्या स्टॅप पेपरवर बंधपत्र /हमीपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

६. अधिकारी/कर्मचारी शाररीक,मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

७. नियुक्ती करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचा कराराचा कालावधी ११ महिने पूर्ण झाल्यानंतर आणि योजना कार्यान्वित असल्यास सदरचा कालावधी संपल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करून पुढील ११ महिन्यांकरिता करार कालावधीमध्ये वाढ करण्याचा अंतिम अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांचा राहील.करार कालावधीमध्ये वाढ झाल्यास पुनश्च करारनामा करणे बंधनकारक राहील.नियुक्तीच्या कालावधीत पदनिहाय दिलेल्या कर्तव्य व जवाबदाऱ्या पार पाडण्याची जवाबदारी हि संबंधित व्यक्तीची राहील व त्याबाबत १००/- रुपयांच्या स्टॅप पेपरवर बंधपत्र/हमीपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

८. नियुक्ती प्राधिकरी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी सदरच्या कंत्राटी सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.

९. नियुक्त झालेला अधिकारी/कर्मचारी त्याच्यावर सोपविलेली जबाबदारी पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक वा इतर कामात गुंतलेला नसावा.

१०. करार पद्धतीवरील नियुक्त कर्मचाऱ्यास कार्यालयात प्राप्त होणारी प्रकरणे,कागदपत्रे व आधारसामग्री याबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.अशा गोपनीयतेच भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती कार्यालयीन कार्यवाही करण्यात येईल.

११.उमेदवारास नियुक्तीच्या वेळी पोलीस विभागाचे चरित्र पडताळणी प्रमाणपत्र बंधनकारक राहील.

१२.सेवा सोडायची असेल तर १ महिना आधी लेखी सूचना द्यावी किंवा १ महिन्याचे मानधन शासनास द्यावे लागेल.

१३.जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे कामकाज हे अत्यावश्यक सेवेत येत असल्यामुळे नियुक्त कर्मचाऱ्यास संपूर्ण जिल्ह्यात/ राज्यात / देशात प्रवास करावा लागेल.

१४.कार्यालीन कामकाजाची वेळ शासकीय वेळेनुसार असेल,कामाच्या व्याप्तीनुसार अधिक वेळापर्यंत अथवा अत्यावश्यक परिस्थितीत काम करण्याची तयारी ठेवावी लागेल.

१५.नियुक्त उमेदवाराच्या ताब्यात असलेल्या कार्यालयीन मालमत्तेची योग्य काळजी त्यास घ्यावी लागेल.सदर मालमत्तेचे नुकसान झाल्यास संबंधीत कर्मचाऱ्यांकडून नुकसान भरपाई घेण्यात येईल.

१६.कंत्राटी नियुक्ती सोडतांना नियुक्त उमेदवाराच्या नियुक्ती नंतर ताब्यात दिलेली सर्व कागदपत्रे,साहित्य,मालमत्ता कार्यालयाकडे जमा करून त्याची पोच पावती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कडे जमा करावी.